महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक


दैनिक ठाणे
# जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा घोडविंदे (एम.डी.)

बुधवार ■ ०१ ऑक्टोबर २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक : ०९९ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये

## दुर्गाडी किल्ल्याच्या विकासासाठी निधी कमी पडू देणार नाही – खासदार डॉ. श्रीकांत शिंदे



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** दुर्गाडी किल्ल्याच्या डागडुजीसाठी राज्य सरकारने आतापर्यंत 16 ते 17 कोटींचा निधी दिला असून या माध्यमातून बुरुज बांधणे, सुशोभीकरण करणे आदी कामे सुरु आहेत. भविष्यात दुर्गाडी किल्ल्याच्या विकासासाठी जो काही निधी लागेल तो दिला जाईल. दुर्गाडी किल्ल्याच्या विकासासाठी निधी कमी पडू देणार नाही असे आश्वासन खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी दिले. श्रीकांत शिंदे यांनी सोमवारी कल्याण येथील किल्ले दुर्गाडीवरील दुर्गामाता मंदिरात जाऊन देवीचे दर्शन घेऊन मनोभावे आरती केली यावेळी ते पत्रकारांशी बोलत होते. मंदिर समितीच्या वतीने देवीमातेची प्रतिमा भेट देऊन खासदार शिंदे यांचे स्वागत करण्यात आले. यानंतर उपस्थितांशी संवाद साधत शिंदे यांनी सर्वांना नवरात्रोत्सवाच्या शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी जिल्हाप्रमुख गोपाळ लांडगे, कल्याण पश्चिम शहरप्रमुख रवी पाटील, उल्हासनगर उपजिल्हाप्रमुख अरुण आशान, माजी नगरसेवक सुनील वायले, मयूर पाटील, मंगेश गोडे, अनिरुद्ध पाटील, सुजित रोकडे, मेघन सल्पी, तसेच स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी श्रीकांत शिंदे यांनी बोलतांना सांगितले कि, किल्ले दुर्गाडीसह आजूबाजूच्या परिसराचा विकास होणार असून याठिकाणी मेरिटाईम बोर्डची जागा आहे ती विकसित करण्याचा मानस आहे. जेणेकरून येणाऱ्या काळात नागरिकांना सुविधा मिळेल. त्याचबरोबर भाटाळे तलावाचा विकास हा देखील मुद्दा असून तो देखील सोडविण्यात येईल असे सांगितले.

## ओला दुष्काळ नाही ; पण सर्व सवलती लागू

### मंत्रिमंडळ बैठकीनंतर मुख्यमंत्र्यांची घोषणा

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

महाराष्ट्रात गेल्या पंधरवड्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे आणि पुरामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. प्राथमिक अंदाजानुसार, राज्यातील तब्बल ६० लाख हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्य मंत्रिमंडळ बैठकीनंतर मोठी घोषणा केली आहे. त्यांनी सांगितले की, ओला दुष्काळ जाहीर होणार नाही, पण सर्व सवलती लागू होतील. बाधित शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी थेट बँक खात्यात मदतीची रक्कम जमा केली जाईल

**■ ओला दुष्काळ जाहीर नाही, पण सर्व सवलती लागू**

विरोधकांकडून 'ओला दुष्काळ' जाहीर करण्याची मागणी होत होती. मात्र, मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले की अधिकृत नियमावलीत अशा प्रकारची संकल्पनाच नाही. तरीदेखील, दुष्काळाच्या काळात शेतकऱ्यांना दिल्या जाणाऱ्या सर्व सवलती आणि सुविधा पूरग्रस्त व पावसामुळे बाधित शेतकऱ्यांनाही लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

**■ दोन-तीन दिवसांत नुकसानीचा अंतिम अहवाल**

अजूनही अनेक ठिकाणी पाणी साचलेले असल्याने नुकसानीचे संपूर्ण मूल्यांकन होऊ शकलेले नाही. पुढील दोन ते तीन दिवसांत संपूर्ण अहवाल तयार केला जाईल. त्यानंतर राज्य सरकार एक संपूर्ण धोरण (Comprehensive Policy) जाहीर करेल आणि केंद्र सरकारकडे मदत पॅकेजसाठी प्रस्ताव पाठवला जाईल.

**■ पहिल्या टप्प्यात २,११५ कोटींचे वाटप सुरू**

ऑगस्टपर्यंत झालेल्या पिकांच्या नुकसानीसाठी २,११५ कोटी रुपयांची मदत शेतकऱ्यांना वाटप करण्याची प्रक्रिया सुरू असल्याचेही फडणवीस यांनी सांगितले. त्याशिवाय, खरीप हंगामात झालेल्या प्रचंड नुकसानीसाठी अतिरिक्त निधी दिला जाणार आहे.

**■ शेतकऱ्यांना कर्ज वसुलीची नोटीस?**

अनेक शेतकरी पुर आणि अतिवृष्टीमुळे उध्वस्त झालेले असताना बँकांकडून कर्ज वसुलीच्या नोटिसा दिल्या जात असल्याची माहिती पुढे आली होती. यावर मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्टीकरण देताना सांगितले की या नोटिसा जुन्या कर्जांसाठी आहेत. मात्र, बँकांना कर्ज वसुलीची कारवाई थांबवण्याचे आदेश देण्यात येतील, असे त्यांनी स्पष्ट केले.

**■ विरोधकांचा सरकारवर हल्लाबोल**

दरम्यान, काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी सरकारवर तीव्र टीका केली आहे. त्यांनी सांगितले की, सप्टेंबरमधील पावसामुळे २४ जिल्ह्यांतील १३७ तालुक्यांमध्ये २६ लाख हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले आहे. तरीदेखील केंद्राकडून मदतीचा प्रस्ताव तातडीने पाठवण्यात आलेला नाही आणि केंद्रीय पथके अद्याप पाहणीसाठी आलेली नाहीत, असा आरोप त्यांनी केला.



## पावसामुळे आवक घटली... फुलांना 'सोन्याचा' भाव

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे, ता. ३० :** साडेतीन मुहूर्तापैकी एक असलेल्या दसऱ्याच्या मुहूर्ताच्या निमित्ताने फुल बाजारात नागरिक गर्दी करत आहेत. ठाण्यातील स्थानक परिसर, जांभळी नाका आणि मुख्य बाजारपेठ ही फुलांनी व सोन्याने म्हणजेच आपट्याच्या हिरव्या पानांनी सजली आहे, मात्र गेल्या काही दिवसांपासून पडणाऱ्या पावसामुळे आवक कमी झाली असून, फुलांच्या किमती वाढल्या आहेत. बाजारात पिवळा, भगवा, नामधारी, लाल या प्रकारातील झेंडूच्या फुलांची मोठ्या प्रमाणावर खरेदी-विक्री होते. ८० ते १५० रुपये किलो भावाने झेंडूच्या फुलांची विक्री होत आहे. देवीच्या पूजेसाठी वापरली जाणारी शेवंती १०० ते २०० रुपये किलो आहे. यासह अस्टर, मोगरा, जाई, जुई, चाफा, गुलछडी, गुलाब, सोनचाफा, जरभरा या फुलांचा बाजार सुरू आहे. यासह झेंडूच्या फुलांचा एक मीटर हार १०० रुपये, तोरण ५० ते १०० रुपये, पूजेसाठी लागणारे बेल पान, तुळस, दुर्वा १० ते २० रुपये जुडीप्रमाणे विकले जात आहे. दसऱ्याच्या अनुषंगाने ठाणे जिल्ह्याच्या ग्रामीण भागातून वाडा, येऊर, भिवंडी, कर्जत, पानखंड आदी भागातील आदिवासी फुलविक्रेते मोठ्या संख्येने ठाण्याच्या बाजारपेठेत दाखल झाले. आदिवासी फुलविक्रेत्यांनी दसऱ्याला लागणारे नवसाचे तोरण, भाताच्या लाह्या, आंब्याच्या टाळा, आपट्याच्या पानांची जोडी, जांभळी फुले, करडू अशा विविध वस्तू बाजारात आणल्या आहेत, मात्र मुसळधार पावसाने महागाई वाढत असून, त्याचा परिणाम विक्रीवर होत असल्याचे आदिवासी विक्रेत्यांनी सांगितले. पावसामुळे फुलांची आवक कमी झाली असून, काही ठिकाणी माल खराब होत आहे. बाजारात दरवर्षी झेंडू फुलांची आवक जास्त प्रमाणात होत असते, मात्र पावसामुळे या फुलांचे नुकसान झाले असून बाजारात आवक घटली आहे. परिणामी, फुलांच्या दरात वीस ते पन्नास टक्क्यांची वाढ झाली असल्याचे फुलविक्रेत्यांनी सांगितले.

## भिवंडीत 'एमएमआरडीए'ची कारवाई!

### 218 अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्याची तयारी

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुंबई :** मुंबई महानगर प्रदेशातील (एमएमआर) अनधिकृत बांधकामांना आळा घालण्यासाठी विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) पावले उचलण्यास सुरुवात केली आहे.

भिवंडीतील २१८ अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्याची कार्यवाही सुरू असून आतापर्यंत येथील ६५ अनधिकृत बांधकामे नियमित करण्यात आली आहेत. यासंबंधीच्या प्रस्तावांना एमएमआरडीएच्या प्राधिकरणाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे.

भिवंडी आणि आसपासच्या परिसरात अनधिकृत बांधकामांचा प्रश्न गंभीर बनला आहे. अनधिकृत बांधकामे पाडण्यात येत असूनअशा इमारतीत घरे घेणाऱ्या रहिवाशांना फटका बसत आहे. त्यामुळे अनधिकृत बांधकामांना आळा घालण्यासाठी एमएमआरडीएने विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून आपली नियुक्ती असलेल्या क्षेत्रात आवश्यक ती कारवाई सुरू केली आहे.

यासाठी मार्गदर्शक सूचना प्रसिद्ध करून वरिष्ठ अधिकाऱ्यांचा समावेश असलेली पथकेही तयार करण्यात आली आहेत. ही पथके अनधिकृत बांधकामांचा शोध घेऊन ती निष्कासनासह नियमितीकरणासंबंधीची प्रक्रिया पूर्ण करीत आहेत. त्यानुसार भिवंडीतील ६० गावांतील १५८१ अनधिकृत बांधकामांवर नोटीसा बजावण्यात आल्याची माहिती एमएमआरडीएकडून देण्यात आली.

नोटीसा बजाविण्यात आलेल्यांपैकी ४६२ अनधिकृत बांधकामांच्या निष्कासनासाठी एमएमआरडीएने पोलीस बंदोबस्तासाठी मागणी केली आहे. यातील १४९ अनधिकृत बांधकामांचे निष्कासन पूर्ण झाले असून ९४ प्रकरणे न्यायप्रविष्ट आहेत. तर २१८ बांधकामांसाठी पोलीस बंदोबस्त मिळाला असून ही बांधकामे निष्कासित करण्याची प्रक्रिया सुरू आहे. त्याचवेळी अनधिकृत बांधकाम नियमितीकरण धोरणाअंतर्गत आतापर्यंत ६५ अनधिकृत बांधकामांचे नियमितीकरण करण्यात आल्याचेही एमएमआरडीएकडून सांगण्यात आले आहे.

## लक्षवेधी

### भातसा नदीच्या पाण्यावर तेलकट तवंग

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**शहापूर :** शहापूर तालुक्यातील बामणे येथील लिबर्टी ऑइल मिल कंपनीने दोन दिवस झालेल्या मुसळधार पावसाचा फायदा घेत भातसा नदीत सांडपाणी सोडल्याचा आरोप करण्यात आला आहे. यामुळे नदीच्या पाण्यावर तेलकट तवंग तयार झाला असून दूषित पाणी वाहत असल्याने नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. या प्रकरणी चौकशी करून तातडीने कारवाई करावी, अशी मागणी शहापूर तहसीलदारांकडे करण्यात आली आहे.

गेले दोन दिवस संततधार कोसळणाऱ्या पावसामुळे शहापुर तालुक्यातील मुंबई महानगराला पाणी पुरवठा करणाऱ्या भातसा धरणाचे पाचही दरवाजे तब्बल चार मीटरने उघडण्यात आले होते. या भातसा नदी मधून मुंबई महानगराला पाणी पुरवठा होत असून तालुक्यातील गोठेघर, वाफे, शहापुर, आसनगाव, कळंभे, बोरशेती यांसह बहुतांशी ग्रामपंचायतींच्या पाणी योजनांद्वारे पाणी पुरवठा करण्यात येतो. दुथडी भरून वाहणाऱ्या भातसा नदीमुळे नदी काठी असलेल्या पाणी योजनांचे पंपगृह पाण्याखाली गेले होते. पावसाने उसंत घेतल्याने आज सकाळी पंप गृहाची स्थिती पाहण्यासाठी गोठेघर वाफे ग्रामपंचायतीचे सरपंच गणेश कामडी आणि कर्मचारी गेले होते. त्यावेळी भातसा नदीच्या पाण्यावर मोठ्या प्रमाणात तेलकट तवंग वाहत असल्याचे दिसून आले.

याबाबत कामडी यांनी चौकशी केली असता, भातसा नदीकाठी बामणे गावच्या हद्दीतील तेल, तुपाचे उत्पादन घेणाऱ्या लिबर्टी ऑइल मिल कंपनीने सांडपाणी भातसा नदीपात्रात सोडले असल्याचे त्यांना समजले. याबाबत सरपंच कामडी यांनी शहापुर तहसीलदारांचे लक्ष वेधले असून भातसा नदीच्या पाण्यावर आलेल्या तेलकट तवंगामुळे पाणी दूषित झाले असून असंख्य नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.

### ठाण्यात दिव्यांगांसाठी 'वन स्टॉप' सक्षमीकरण केंद्र

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे** - ठाणे जिल्ह्यातील दिव्यांग बांधवांना शासकीय योजना, सुविधा आणि सेवांचा लाभ अधिक सुलभ व परिणामकारक पद्धतीने मिळणार असून त्यांची धावपळ थांबण्यास मदत होणार आहे. ठाणे जिल्हा परिषदेच्या मुख्य इमारतीत नुकतेच जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण कार्यालय कार्यान्वित झाले असून, हे केंद्र दिव्यांगांसाठी सर्व प्रकारच्या योजनांचे मार्गदर्शन आणि सहाय्य देणारे केंद्र ठरणार आहे.

दिव्यांग नागरिकांसाठी शिक्षण, रोजगार, उद्योजकता, प्रवास सवलती, आरोग्य सेवा, निवास, शिष्यवृत्ती अशा विविध कल्याणकारी योजनांचा लाभ घेण्यासाठी आधी दिव्यांग नागरिकांना सतत कार्यालयात धावपळ करावी लागत होती. दिव्यांग नागरिकांची ही धावपळ थांबावी यासाठी दिव्यांग सक्षमीकरण कार्यालय कार्यान्वित करण्यात आले आहे. त्यामुळे दिव्यांग नागरिकांना आता वेगवेगळ्या विभागांची धावपळ करावी लागणार नाही.

## दोन्ही रुग्णांवर आवश्यक उपचार केले !

### सर्पदंशाच्या दुहेरी मृत्यूवर केडीएमसी आरोग्य विभागाचा खुलासा

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**डोंबिवली :** डोंबिवलीतील खंबाळपाडा परिसरात सोमवारी (दि. २९) ३ वर्षांची चिमुकली प्राणवी भोईर आणि तिची २४ वर्षांची मावशी श्रुती ठाकूर या दोघींचा सर्पदंशाने दुर्दैवी मृत्यू झाला. नातेवाइकांनी या प्रकरणी KDMC रुग्णालय प्रशासनाने हलगर्जीपणा केल्याचा आरोप करत या दुहेरी मृत्यूला नातेवाईक आणि स्थानिकांनी KDMC रुग्णालय प्रशासनाला जबाबदार ठरवले आहे. त्यांनी वेळेत अँटी-स्नेक डोस देण्यात उशीर केला, प्राथमिक उपचारांमध्ये हलगर्जीपणा केला आणि आवश्यक सुविधा नसल्यामुळेच दोन जीव गमावले असे आरोप केले आहेत. संतप्त नागरिक आणि नातेवाईकांनी थेट मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. दीपा शुक्ल यांच्या दालनात ठिय्या आंदोलन सुरू केले आणि जबाबदार डॉक्टरांवर कारवाईची मागणी केली. दरम्यान या सर्पदंश प्रकरणावर महापालिकेच्या आरोग्य विभागाने प्रसिद्धिपत्रकामार्फत खुलासा केला असून दोन्ही रुग्णांवर आवश्यक उपचार करून त्यांना अँटी-व्हेनम इंजेक्शन दिलं होतं. मात्र, प्रकृती गंभीर झाल्याने प्राणवीला ठाण्यात हलवण्यात आल्याचे नमूद केले आहे.



> सर्प दंश झालेल्या दोन्ही रुग्णांवर शास्त्रीनगर सामान्य रुग्णालय येथे दाखल झाल्यानंतर तात्काळ मार्गदर्शक सुचनांप्रमाणे संपूर्ण उपचार करण्यात आले होते. सर्प दंश विरोधी लसीचा पुरेसा साठा महानगरपालिकेच्या दोन्ही रुग्णालयात उपलब्ध असून जानेवारी २०२५ पासून एकूण १३४ सर्प दंशाच्या रुग्णांवर महापालिका आरोग्य विभागामार्फत उपचार करण्यात आले आहेत.
>
> **■ डॉ. दीपा शुक्ल, वैद्यकीय आरोग्य अधिकारी**

कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या रुक्मिणीबाई आणि शास्त्रीनगर रुग्णालयात दोन प्रत्येकी १२० बेड क्षमतेची रुग्णालये असून दोन्ही रुग्णालयांमार्फत दैनंदिन बाह्य रुग्ण विभाग आणि २४X७ अपघात विभाग चालू असतो. अपघात विभागात न्याय वैद्यकीय तपासण्या, गंभीर आजाराचे रुग्ण, अपघातग्रस्त रुग्ण, श्वान दंश, विंचू दंश तसेच सर्पदंश इत्यादी रुग्णांवर नियमितपणे उपचार केले जातात. दिनांक २८.०९.२०२५ रोजी सकाळी ५.३० वाजता कु. प्राणवी भोईर, वय ४ वर्षे आणि श्रीम. श्रुती ठाकूर, वय २३ वर्षे शास्त्रीनगर रुग्णालयात उपचारासाठी दाखल झाले. नातेवाईकांकडून मिळालेल्या माहितीनुसार दोघींनाही मण्यार जातीच्या विषारी सापाने दंश केला होता. अपघात विभागात कर्तव्यावर हजर असलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी दोघींनाही तपासले आणि ताबडतोब उपचार सुरू करत दोन्ही रुग्णांना सर्प दंश विरोधी लस देण्यात आली. प्राणवी भोईर यांचेबाबत PICU मधील बालरोग तज्ञांचा सल्ला घेण्यात आला. तसेच प्रयोगशाळेमध्ये BT/CT" इ. तपासण्या त्वरित करण्यात आल्या. तथापि दोन्ही रुग्णांची तीव्र लक्षण दिसून आल्यामुळे त्यांना उच्चस्तरीय अतिदक्षता विभागात उपचार आवश्यक असल्याने त्यांना ठाणे येथे संदर्भित करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार सकाळी ६.४५ वाजता पुढील उपचारासाठी महानगरपालिकेच्या रुग्णवाहिकेतून ऑक्सिजन सपोर्टसह दोन्ही रुग्णांना सिव्हिल हॉस्पिटल, ठाणे येथे संदर्भित करण्यात आले. सर्प दंश झाल्यानंतर, चावलेल्या सापाचा प्रकार तसेच सर्प दंशाची जागा, विषबाधेची तिव्रता, रुग्णाचे वय आणि वजन इ. बाबी रुग्ण उपचाराला कसा प्रतिसाद देतो यासाठी महत्वाच्या असतात, रुग्णाच्या प्रकृतीनुसार सर्प दंश विरोधी लसीचा डोस देण्यात येतो. असे पालिकेच्या वैद्यकीय आरोग्य अधीकारी डॉ. दीपा शुक्ल यांनी प्रसिद्धी माध्यमांना दिलेल्या खुलासेवार माहिती नमूद केले आहे.




## २७ गावांतील कर्मचाऱ्यांना नियुक्तीपत्रे

### कामगारांसाठी विजयाचा दिवस

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** नवरात्रीच्या मुहूर्तावर कल्याण ग्रामीणमधील कामगारांसाठी ऐतिहासिक दिवस ठरला. कल्याण ग्रामीणमधील २७ गावांतील ४९९ कर्मचाऱ्यांना अखेर नियुक्तीपत्रांचे वाटप करण्यात आले. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला विषय महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या अथक प्रयात्नाने हा प्रश्न मार्गी लागला. या ऐतिहासिक क्षणी सर्व कामगार वर्ग आणि त्यांच्या परिवाराने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व खासदार श्रीकांत शिंदे यांचे आभार मानले. कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेत झालेल्या या कार्यक्रमात आयुक्त अभिनव गोयल, उपायुक्त हर्षल गायकवाड आणि कल्याण ग्रामीणचे आमदार राजेश मोरे यांच्या हस्ते आज कामगारांना नियुक्ती पत्र वाटप करण्यात आले.

नवरात्रीच्या मंगल प्रसंगी झालेल्या या नियुक्तीपत्र वितरणामुळे कामगार व त्यांच्या परिवारात आनंदाचे, समाधानाचे आणि अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे. हा दिवस आनंदाचा, विजयाचा आणि अभिमानाचा आणि ऐतिहासिक ठरला असल्याचे आमदार राजेश मोरे यांनी सांगितले.



# शारदीय नवरात्रोत्सवानिमित्त मोफत नेत्र तपासणी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : शारदीय नवरात्रोत्सवात नागरिकांच्या आरोग्याच्या सेवेसाठी डॉ. अग्रवाल आय हॉस्पिटलच्या सहकार्याने मोफत नेत्र तपासणी शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या उपक्रमाचा उद्देश नागरिकांना मोफत नेत्र तपासणी सुविधा उपलब्ध करून देणे, डोळ्यांच्या आरोग्याविषयी जनजागृती करणे व योग्य वेळी वैद्यकीय सल्ला मिळवून देणे हा होता. कल्याण पूर्वेतील गणेश नगर, नवरात्रोत्सव मंडळ या ठिकाणी आयोजित शिबिराचा



लाभ शेकडो नागरिकांनी घेतला. तज्ज्ञ डॉक्टर्सनी मोफत तपासणी करून आवश्यक सल्ला दिला. अनेक नागरिकांना डोळ्यांच्या आजारांबाबत मार्गदर्शन व पुढील उपचाराची दिशा या शिबिरातून मिळाली.

या प्रसंगी जनसेवक प्रज्वल खैरनार यांनी कृतज्ञता व्यक्त करताना म्हटले कि, “जनतेची सेवा हीच आमची खरी ताकद आहे. आरोग्यसेवा प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचावी हा आमचा ध्यास आहे. नवरात्र उत्सवाच्या देवीच्या आशीर्वादाने हे कार्य अधिक अर्थपूर्ण झाले असून अशा उपक्रमांचे आयोजन भविष्यातही सुरू राहील. या शिबिरामुळे जनतेच्या आरोग्यसुरक्षेच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले गेले असून लोकसेवेच्या अखंड कार्यात अजून एक यशस्वी अध्याय लिहिला गेला आहे.

# आत्मबोधाचे अनोखे पर्व नवरात्र

दोन ऋतुंच्या संधिकालात साजरा केला जाणारा उत्सव म्हणजे नवरात्र. स्वतःचा शोध घेण्यासाठी अत्यंत विलक्षण आणि अद्भूत असे नऊ दिवसांचे पर्व आहे. अश्विन महिन्यातील शुद्ध प्रतिपदेपासून ते नवमीपर्यंतचे हे महापर्व मानवाच्या अंतरिक ऊर्जेच्या विभिन्न प्रकारांचे प्रतिनिधित्व करते. याच ऊर्जेला नऊ देवींच्या शक्तीची उपमा दिली जाते. शैलपुत्री, ब्रह्मचारिणी, चंद्रघंटा, कुष्मांडा, स्कंदमाता, कात्यायणी, कालरात्रि, महागौरी, सिद्धिदात्री या मनुष्यातील ऊर्जेची वेगळेवेगळी रुप असल्याचे म्हटले जाते.

### कोण आहेत नवदुर्गा?

नवदुर्गाचे प्रथम स्वरुप असलेली शैलपुत्री देवी तिच्या त्रिशुलाप्रमाणे त्रीलक्ष्य, धर्म, अर्थ आणि मोक्ष यांसह मनुष्याच्या मूलाधार चक्राचे सक्रीय बळ आहे. तर, बह्मचारिणी देवी आपल्या कमंडलू म्हणजेच पूर्व कर्म, प्रारब्ध आणि हातातील माळ म्हणजे नवनीत कर्म यांसह कुंडलिनी शक्तीचे प्रतिनिधित्व करत स्वाधिष्ठान चक्रची शक्ती आहे. आपल्यातील मणिपूर चक्र अर्थात नाभी चक्राची ऊर्जा असलेली चंद्रघंटा देवी जीवनात अनेक उत्तम क्षण आणि ब्रह्मांड ध्वनींसह हातातील कमळाच्या रुपात चिखलातही पवित्रता आणि स्निग्धतेच्या



माध्यमातून अनेक लक्ष्य साध्य करण्यासाठी लागणाऱ्या एकाग्र आणि एकत्रितपणाचे द्योतक आहे. अनाहत चक्र म्हणजेच हृदय चक्र गतिशील, ऊर्जा प्रवाहित करणारी कुष्मांडा देवी हातातील शस्त्र, कमंडलू, पुष्प, अमृत, कलश, चक्र व गदा यांसह धनुष्यबाण यांसारख्या अनेक सिद्धी आणि निधींना एकत्रित करून लक्ष्याकडे अग्रेसर होण्याचे संकेत देते. विशुद्ध चक्र म्हणजेच कंठ चक्राची क्रियाशील शक्ती असलेली स्कंदमाता आपल्या हातातील पंकजाच्या रुपात एका केंद्रस्थानी चेतनाचा विस्तार परिलक्षित करते.

आज्ञा चक्राच्या ऊर्जेला कात्यायणी म्हटले जाते. आपल्या तलवारीच्या धारेप्रमाणे जीवात्माला आपल्या तत्व शब्दांनी बांधून परम चेतना सद्गुरू म्हणजेच परमात्म्यात एकरूप होण्याची प्रेरणा देते. कालरात्रि मुख्यत्वे करून सहस्रार चक्राचा पाया मानली जाते. आपल्या कृपाणाने सर्व बंधनातून मुक्त करत काल म्हणजे समय ज्याला ईश्वर मानले गेले आहे, त्यांची सहमती आणि कृपा प्रदान करून स्थूल शरीराच्या पुढे जाण्यासाठी कालरात्रि प्रेरित करते. महागौरी सहस्राचाराची मध्यशक्ती आहे. अभय मुद्रा, वर मुद्रा, डमरू मुद्रा आणि शूल यांच्या माध्यमातून महाध्वनी अर्थात परम नादाला जोडण्यास सहाय्यक होते. सहस्राचाराची उच्च ऊर्जा सिद्धिदात्री आपल्या अष्टसिद्धी, अणिमा, महिमा, गरिमा, लघिमा, प्राप्ती, प्राकाम्यप, ईशित्व आणि वशित्व यांच्या मदतीने मोक्षाची गती प्रदान करते.

### अंबा देवी कोण आहे?

भारतात साजरे केले जाणारे नवरात्री पर्व नितांत वैज्ञानिक धारणांची एक जीवंत परंपरा आहे. नवरात्री पर्वाला अंबा पर्व म्हटले गेले आहे. अंबा शब्द अम्म आणि बा यांपासून बनला आहे. काही ठिकाणी अम्मचा अर्थ जल आणि बा याचा अर्थ अग्नि म्हणजेच विद्युत वा वीज. म्हणूनच काही ठिकाणी नवरात्रीला विद्युतरात्री म्हणजेच शक्तीरात्र असेही म्हटले जाते. नवरात्रीला अहोरात्री असेही म्हटले जाते. स्वतःमधील ऊर्जेला ओळखण्याचा हा काळ मानला जातो.

### नवरात्री आत्मबोधाचा काळ

आध्यात्मिक दृष्टिकोनातून याला स्वजागरण आणि आत्मबोधाचा काळ मानले गेले आहे. अपूर्ण आध्यात्मिक सामान्य ज्ञान याला शक्ती प्रदान करणे, संघर्ष करण्याच्या विस्ताराशी जोडण्याचे काम करते. संघर्ष याचा अर्थ बाह्य युद्ध नाही, तर शक्तीच्या माध्यमातून स्वतःमधील महाऊर्जा आहे. अंतर्मनाची शक्ती आहे. नवरात्री हा स्वतःचा स्वत्वाचा शोध घेण्याचा काळ आहे. त्रिरात्री स्वपरिचय आणि ज्ञान बोध, त्रिरात्री संकलन आणि संचरण म्हणजे प्रसार आणि त्रिनिशा अर्थ प्राप्ती असल्याचे सांगितले जाते. वैज्ञानिक चिंतनाप्रमाणे आपण आपल्या मेंदूचा काही टक्के वापर करतो. मात्र, आपल्यातील चेतना शक्तीत मेंदूपेक्षा नऊपट जास्त क्षमता असते. त्यामुळे चेतना शक्ती जागृत करून एकूणच आपली क्षमता वाढवण्याचा काळ म्हणजे नवरात्र असल्याचे म्हटले जाते.

- सद्गुरुश्री स्वामी आनंदजी

# पड्घ्यात पुराच्या पाण्यामुळे नागरीकांचे नुकसान

## भादाणे, जुपाडा,आतकोली, आन्हे, सोर, वांद्रे गावात भरपाई मिळण्यासाठी तहसीलदारांना निवेदन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**पडघा** : भिवंडी तालुक्यातील पडघा विभागातील दुर्गम भागात असलेल्या विविध गावांतील घरामंधे अतिवृष्टी व नदीचे पाणी शिरून मोठ्या प्रमाणात नागरीकांचे नुकसान झाल्याने नुकसान भरपाई देण्याची मागणी करण्यात आली आहे. तालुक्यातील भादाणे, जुपाडा, आतकोली, आन्हे, सोर, वांद्रे गावातील घरामध्ये २७ व २८ सप्टेंबर रोजी झालेल्या अतिवृष्टी व भातसा नदी, पिसे डॅमला वाढलेल्या पाण्यामुळे बहुसंख्य नागरीकांच्या घंरामधे पाणी शिरून घरातील जिवनावश्यक वस्तू,अन्नधान्य, कपडे, व



आवश्यक सामानाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. तसेच पाळीव पशुधनाचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याने गरीब नागरीक हवालदिल झाले आहेत. त्यामुळे शासन स्तरावर पुरग्रस्त बाधीत नागरीकांचे ताबडतोब पंचनामे करून नुकसानभरपाई देण्याची मागणी शिवसेना ठाकरे गटाचे उपजिल्हाप्रमुख व भिवंडी पंचायत समितीचे माजी उपसभापती प्रकाश भोईर यांनी लेखी निवेदनाद्वारे तहसीलदार भिवंडी यांच्याकडे केली आहे.

# 'स्वस्थ नारी निरोगी परिवार' याअभिमान अंतर्गत रक्तदान शिबीर

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण** : 17 सप्टेंबर ते 02 ऑक्टोबर "स्वस्थ नारी निरोगी परिवार' याअभिमान अंतर्गत ‘सेवा पंधरवडा’ म्हणून आरोग्याच्या दृष्टीने केंद्र सरकार तसेच राज्य सरकार मा. मुख्यमंत्री, मा.आरोग्यमंत्री,यांच्या मार्गदर्शक सूचनेनुसार सर्वत्र राबविण्यात येत आहे. "सेवा पंधरवडा" हा राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि मा.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या जन्मदिनाच्या औचित्य साधून राबविण्यात येत आहे. राष्ट्रपिता महात्मा गांधीजींच्या सेवाभाव तत्त्वज्ञानाचा आणि मा.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विकासाभिमुख विचारांचा हा संगम साधणारा उपक्रम असून महाराष्ट्र शासन-प्रशासनाला लोकाभिमुख, कार्यक्षम आणि अधिक पारदर्शक करण्याच्या दिशेने एक ऐतिहासिक पाऊल आहे .

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनानुसार महिलांच्या आरोग्याविषयी जागरूकता वाढविण्यासाठी आणि त्यांना आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी 'स्वस्थ नारी निरोगी परिवार' हे विशेष अभियान सर्वत्र देशात तसेच महाराष्ट्रातील जिल्ह्यात राबविण्यात येत आहे. या अभियानाचे मुख्य उद्दिष्ट ग्रामीण आणि शहरी भागातील महिलांना त्यांच्या आरोग्याविषयी शिक्षित करणे आणि त्यांच्यासाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिरे आयोजित करणे आहे. महिला व बालकांसाठी हे विशेष आरोग्य शिबिरे आयोजित करून प्रत्येक आयुष्यमान आरोग्य अभियानात आणि अंगणवाडीमध्ये आरोग्य तपासणी, मार्गदर्शन शिबिरं भरवण्यात येत आहेत. या "सेवा पंधरवडा " च्या निमित्ताने सर्वत्र स्वैच्छिक रक्तदान शिबीर अभियान राबविण्यात येत आहे.

स्वैच्छिक रक्तदान आणि एड्स प्रतिबंध व नियंत्रण जनजागृती:- केंद्र सरकार आणि महाराष्ट्र शासन यांच्या मार्गदर्शक सुचनेनुसार मा.प्रकल्प संचालक, महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था, मुंबई तसेच मा.संचालक, राज्य रक्त संक्रमण परिषद यांच्या स्वैच्छिक रक्तदान अभियानाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार जिल्ह्यात जिल्हाधिकारी तसेच जिल्हा शल्यचिकित्सक यांच्या अधिपत्याखाली जिल्हा रुग्णालय -अलिबाग अंतर्गत एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभाग यांच्या विद्यमाने "इंटिसिफाईड आय ई सी कॅम्पेन" अभियाना अंतर्गत "एचआयव्ही/एड्स" या आजाराविषयी जनजागृती आणि रक्तकेंद्रामार्फत "राष्ट्रीय स्वैच्छिक रक्तदान" अभियान जनजागृतीचे महान कार्य राबविण्यात येत आहे. 01 ऑक्टोबर "राष्ट्रीय स्वैच्छिक रक्तदान दिवस" दरवर्षी स्वैच्छिक रक्तदान अभियान म्हणून साजरा केला जातो. याचा मुख्य उद्देश समाजात रक्तदान करणाऱ्यांची संख्या वाढवणे आणि सुरक्षित रक्तपुरवठ्यासाठी स्वैच्छिक रक्तदानाचे महत्त्व पटवून देणे हा आहे. लोकांना स्वैच्छिक रक्तदानासाठी प्रोत्साहित करण्यासाठी

"सेवा पंधरवडा’...च्या निमित्ताने जनतेच्या सेवेसाठी, राष्ट्राच्या पुनरुत्थानासाठी राबविण्यात येत आहे. या वर्षीच्या शासनाचे घोषवाक्ये आहे.... रक्त देऊ या, आशा जागवू या,. एकत्रितपणे जीव वाचवू या...। Give blood, give hope: together we save lives..

समाजात स्वैच्छिक रक्तदान करणाऱ्यांची संख्या वाढवणे आणि रुग्णांसाठी सुरक्षित रक्त पुरवठ्यासाठी जनजागृती करणे. 01 ऑक्टोबर 1975 रोजी हा दिवस सर्व प्रथम साजरा करण्यात आला होता. तरुण पिढीमध्ये रक्तदान करण्याबद्दल जागरूकता निर्माण व्हावी हा यामागचा मुख्य उद्देश. राष्ट्रीय स्वैच्छिक रक्तदान अभियान आरोग्य सेतू पोर्टलवर https://eraktkosh.mohfw.gov.in/ या वेबसाईटवर रजिस्टर नोंदणी करून स्वैच्छिक रक्तदान करुन रक्तदानाबद्दल ऑनलाईन रक्तदान प्रमाणपत्र देता येते.माझे "स्वैच्छिक रक्तदान" का महत्त्वाचे :-

- थॅलेसेमिया,हिमोफिलिया,प्रसूती,अपघात,रक्तक्षय, इ.रुग्णांसाठी रक्त हे "लाईफ लाईन" आहे, अशा रुग्णांना नेहमी रक्ताची गरज असते. अशा रुग्णांचा जीव वाचविण्यासाठी माझे रक्तदान अमूल्य आहे.
- बोन मॅरोमध्ये नवीन रक्त तयार करण्याची कार्यक्षमता वाढते.
- रक्तदान प्रक्रियेत रक्तदानाची सुरक्षितता काटेकोरपणे पाळली जाते. त्यामुळे कोणत्याही इजा किंवा आजार होण्याची शक्यता नसते.
- मानवी रक्ताला पर्याय नाही कारण "रक्त" हे कृत्रिमरित्या प्रयोगशाळेत तसेच कारखान्यात तयार करता येत नाही तसेच जास्त दिवस साठवूनही ठेवता येत नाही. त्यामुळे माणसाचा जीव वाचविण्यासाठी माणसाचेच रक्त द्यावे लागते.
- दान केलेले रक्त शरीरात नैसर्गिकरित्या भरून निघते.
- माझ्या स्वैच्छिक रक्तदानाने एखाद्या रुग्णांचे प्राण वाचवू शकतो.
- माझे रक्तदान सुरक्षित,आनंददायी तसेच वेदनारहित असते.
- नियमित रक्तदानाने शरीरातील कोलेस्टेरॉल व रक्तदाब नियंत्रित तसेच कॅन्सर सारख्या आजाराचा धोका कमी राहतो.
- रक्तदान करतेवेळी मार्गदर्शक सूचनेनुसार संपूर्ण तपासणी करून रक्त घेतले जाते.
- मार्गदर्शक सुचनेनुसार स्वैच्छिक रक्तदान करून कार्डावर दोन वर्षात एक वेळेस मोफत रक्तपुरवठा केला जातो.
- रक्तदान हे जीवनदान आहे म्हणून "रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान" आहे.
- समाजाचा एक जबाबदार नागरिक म्हणून नि:स्वार्थपणे, समाजहितासाठी, राष्ट्रसेवेच्या भावनेतून... आपले रक्तदान महत्त्वाचे.
- दर तीन महिन्यांनी आपण रक्तदान करु शकता.

रक्त" हे शरीराचा अविभाज्य घटक असून संपूर्ण मासपेशींना तसेच अवयवांना पोषण व प्राणवायू (ऑक्सीजन) देण्याचे काम रक्त करत असते. गरजू रुग्णांसाठी रक्तदान केल्याने त्यांचे प्राण आपण वाचवू शकतो, असा संदेश "स्वैच्छिक रक्तदाता" म्हणून समाजासाठी देऊ शकतो.

स्वैच्छिक रक्तदान अमृत महोत्सव अभियान राबविण्यात येणाऱ्या आरोग्य सेतू पोर्टल वर स्वैच्छिक रक्तदानासाठी रजिस्टर करून स्वैच्छिक रक्तदात्यांनी सहभागी होऊन गरजू रुग्णांचे प्राण वाचविल्याचे समाधान समाजासाठी व्यक्त करु शकता.यामध्ये अनेक रक्तदाते मानवतेसाठी मा.पंतप्रधान यांचा मिशनचा हिस्सा बनण्यासाठी सामिल झाले आहे.

या रक्तदान मोहिमेत आपणही सहभागी होऊन आपण रुग्णांचे प्राण वाचविण्याचे पवित्र काम करु शकता. अनेक सेवाभावी संस्था, सामाजिक संस्था आणि सामान्य माणसांनीही रक्तदानासाठी मोठ्या प्रमाणावर सहभागी होऊन रक्तकेंद्रात आवश्यक तेवढा रक्तसाठा उपलब्ध होईल”. रक्तदान हे महान कार्य आहे तसेच मानवी रक्ताची गरज कधीही न संपणारी असल्यामुळे रक्तदानाविषयी प्रेरणा समाजात दृढ करणे, निरोगी रक्तदात्यांची फौज उभी करून रक्तदात्यांमध्ये स्वैच्छिक रक्तदानाविषयी जनजागृती करणे,

माणुसकीच्या दृष्टीने ,सामाजिक बांधिलकी ठेवून , देशाचा नागरिक म्हणून रुग्णाचे प्राण वाचवण्यासाठी जास्तीत जास्त लोकांनी "स्वैच्छिक रक्तदान" या राष्ट्रीय मोहिमेत सहभागी व्हावे एवढीच अपेक्षा....

समाजात रक्तदानाविषयी जनजागृती व्हावी यामागे एवढाच उद्देश.

असे आवाहन हेमकांत सोनार ,रक्तपेढी तंत्रज्ञ जिल्हा रुग्णालय,रक्तकेंद्र.अलिबाग-रायगड ९५११८८२५७८ यांनी केले आहे.

# जीवनदीप खर्डी महाविद्यालयात जागतिक भाषांतर दिनानिमित्त एकदिवसीय कार्यशाळा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**खर्डी** : कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, खर्डी येथे दि.30 ऑक्टोबर 2025 रोजी जागतिक भाषांतर दिनानिमित्त वांङमय मंडळ आयोजित एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन मोठ्या उत्साहात करण्यात आले. दरवर्षी ३० सप्टेंबर रोजी संत जेरॉम यांच्या स्मृतीदिनानिमित्त हा दिवस जागतिक स्तरावर साजरा केला जातो. संत जेरॉम हे बायबलचे अनुवादक व भाषांतराचे जनक म्हणून ओळखले जातात.



जीवनदीप संस्थेचे अध्यक्ष श्री. रवींद्र घोडविंदे यांच्या प्रेरणेने व प्राचार्य कैलास कळकटे सरांच्या मार्गदर्शनाने सदर कार्यशाळेच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. प्राचार्य कैलास कळकटे यांनी यांनी आपल्या प्रास्ताविकात, “२१ वे शतक हे भाषांतराचे शतक आहे. जागतिकीकरणाच्या या युगात भाषांतराविना जगणे अशक्य आहे. साहित्य, विज्ञान, तंत्रज्ञान, व्यापार, उद्योग अशा सर्व क्षेत्रात भाषांतराची गरज सतत वाढत आहे,” असे प्रतिपादन केले.

पहिल्या सत्रात प्रा.दिप्ती मोरे यांनी भाषांतराचा इतिहास व जागतिक महत्त्व या विषयावर मार्गदर्शन केले. तर दुसऱ्या सत्रात प्रा.राहुल सोनावणे यांनी जागतिकीकरणाच्या युगात भाषांतराची आवश्यकता व संधी या विषयावर सविस्तर विवेचन केले. या कार्यशाळेत विद्यार्थ्यांना भाषांतराचे व्यावहारिक पैलू, साहित्य व विज्ञान क्षेत्रातील योगदान, तसेच करिअरच्या नव्या वाटा यावर माहिती मिळाली. या कार्यशाळेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला .

# नवी मुंबई महानगरपालिका करणार अभिजात मराठी भाषेचा जागर

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**नवी मुंबई** : मागील वर्षी 3 ऑक्टोबर 2024 रोजी मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा जाहीर झाला आणि मराठी भाषेचा गौरव अधिकच वृध्दींगत झाला. या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाच्या मराठी भाषा विभागाने जारी केलेल्या परिपत्रकानुसार संपूर्ण राज्यभरात दि. 3 ऑक्टोबर रोजी ‘अभिजात मराठी भाषा दिवस’ आणि दि. 3 ते 9 ऑक्टोबर 2025 या कालावधीत ‘अभिजात मराठी भाषा सप्ताह’ साजरा करण्यात येत आहे.

शुक्रवार दि. 3 ऑक्टोबर 2025 रोजी अभिजात मराठी भाषा दिनाचे औचित्य साधून साहित्य अकादमी, नवी दिल्लीचे शासकीय सदस्य तथा सुप्रसिध्द साहित्यिक, व्याख्याते डॉ. प्रा. नरेंद्र पाठक यांचे ‘अभिजात मराठी – अभिमान मराठी’ या विषयावर सकाळी 11.00 वाजता महापालिका मुख्यालयात तिस-या मजल्यावरील ज्ञानकेंद्रात व्याख्यान संपन्न होणार आहे.

त्याचप्रमाणे भाषेतील शुध्दलेखनाचे महत्व लक्षात घेऊन ‘अभिजात मराठीचे शुध्दलेखन’ या विषयावर लेखक, गज़लकार श्री. जनार्दन म्हात्रे हे दि. 07 ऑक्टोबर (मंगळवार) रोजी सकाळी 11.00 वाजता सादरीकरणाव्दारे सुसंवाद साधणार आहेत.अभिजात मराठी भाषेची व साहित्याची आवड अनेकजण आत्मियतेने जपतात. हे लक्षात जाणून मराठी भाषा आणि साहित्य विषयक ‘प्रश्नमंजुषा स्पर्धा’ हा अभिनव उपक्रम दि. 8 ऑक्टोबर (बुधवार) रोजी सकाळी 11.00 वाजता आयोजित करण्यात आला आहे. यामध्ये नमुंमपा अधिकारी, कर्मचारी त्याचप्रमाणे साहित्यप्रेमी नागरिकही सहभागी होऊ शकतात. या उपक्रमांतर्गत उपस्थितांना मराठी भाषा व साहित्य विषयक प्रश्न विचारले जाणार असून कार्यक्रमस्थळी उपस्थित असणा-या श्रोत्यांमधून योग्य उत्तरे देणा-या श्रोत्यास त्याचवेळी पुस्तक स्वरुपात पारितोषिक प्रदान केले जाणार आहे. अशाच प्रकारचा आणखी एक ‘काव्यवाचन स्पर्धा’ हा अभिनव उपक्रम दि. 09 ऑक्टोबर (गुरुवार) रोजी सकाळी 11.00 वाजता आयोजित करण्यात आला असून यामध्ये स्वत:च्या नव्हे तर अभिजात मराठी भाषेतील नामवंत कवींच्या आपल्याला आवडलेल्या एका कवितेचे कमाल पाच मिनीटात सादरीकरण करावयाचे आहे.या स्पर्धांमधील सहभागाकरिता दि. 6 ऑक्टोबर 2025 पर्यंत 9920378574 किंवा 9930020814 या संपर्कध्वनी क्रमांकावर नाव नोंदणी करणे आवश्यक राहील. ऐनवेळी स्पर्धा प्रवेश दिला जाणार नाही याची नोंद घेण्यात यावी. विनामूल्य प्रवेश असलेल्या ‘प्रश्नमंजुषा स्पर्धा’ व ‘काव्यवाचन स्पर्धा’ यामध्येही उत्स्फुर्त सहभाग घ्यावा असे आवाहन करण्यात येत आहे.

# पेण शहरातील टायरच्या दुकानाला आग

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण** : पेण शहरातील बालाजी कॉम्प्लेक्सच्या बाहेरील पंचर टायरच्या दुकानाला अचानक आग लागल्याने परिसरात एकच गोंधळ उडाला. काही क्षणांतच धुराचे प्रचंड लोट मुख्य रस्त्यासह राहणाऱ्या नागरिकांच्या घरांमध्ये व आजूबाजूच्या सोसायटीमध्ये शिरल्याने



लोकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. घटनेची माहिती मिळताच पेण नगरपालिकेचे अग्निशमन दल तत्काळ घटनास्थळी दाखल झाले आणि अथक प्रयत्नांनंतर आगीवर नियंत्रण मिळवले. तसेच कोणतीही घटना घडू नये यासाठी पेण पोलीस दल घटनास्थळी उपस्थित राहून सदरचा परिसर सुरक्षित केला. आगीचे नेमके कारण समजू शकले नसले तरी आगीत मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान झाल्याचे प्राथमिक अंदाजातून समोर आले आहे. मात्र सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही.या घटनेनंतर नागरिकांमध्ये चर्चा सुरू होती.

# भाजपा अनुसूचित मोर्चा शहापूर दक्षिण मंडळ अध्यक्ष पदी प्रकाश वाघमारे यांची निवड

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर ग्रामीण** : वासिंद येथील सामाजिक कार्यकर्ते व सर्व सामान्य गोरगरिबांसाठी धावून जात त्यांना मदत करणारे प्रकाश वाघमारे यांची नुकतीच भारतीय जनता पार्टी शहापूर तालुका (दक्षिण मंडळ ) अनुसूचित मोर्चा तालुका अध्यक्ष पदी निवड करण्यात आली आहे.

शहापूर तालुका मध्यवर्ती कार्यलयात झालेल्या पक्ष संघटनेच्या बैठकीत हि निवड करण्यात आली. भाजपा अनुसूचित मोर्चा जिल्हाअध्यक्ष काळूराम धनगर यांनी वासिंद येथील प्रकाश वाघमारे यांची संघटनेतील कार्याची दखल घेत त्यांच्यावर हि जबाबदारी सोपविली आहे. पक्षाच्या ध्येय धोरणानुसार संघटन कौशल्याने तालुक्यात भाजपा संघटन वाढविण्यासाठी अथक परिश्रम करावे यासाठी भारतीय जनता पार्टी शहापूर तालुका दक्षिण मंडळ अध्यक्ष दिपक बोंबे यांनी नियुक्ती पत्र देऊन निवड केली आहे.

या निवडीवेळी शहापूर तालुकाध्यक्ष भास्कर जाधव, दक्षिण मंडळ अध्यक्ष दीपक बोंबे, शहापूर शहर अध्यक्ष विवेक नार्वेकर, नगरसेवक विनोद कदम, कार्यकर्ते प्रमोद बसवंत आदी पदाधिकारी उपस्थित होते.




**मेष**
आध्यात्मिक क्षेत्रात काम करणाऱ्यांना मनाची एकाग्रता साधता येईल. आध्यात्मिक चेतना मिळेल. मुलांकडून सुखद बातमी कळेल.

**वृषभ**
स्वप्ने पूर्ण होतील. अविवाहितांसाठी लग्नाचे प्रस्ताव. लांबलेल्या प्रकरणात यश. यश मिळेल. मतभेदांपासून लांब रहा.

**मिथुन**
अनुकूलतेमुळे मन प्रसन्न राहील. कार्यक्षेत्राचा विकास आणि विस्तार होईल.अभीष्ट सिद्धी होईल. फायदा होईल. विरोधक करार करतील.

**कर्क**
भागीदारीतून विशेष लाभ. उपजीविकेच्या स्त्रोतातून लाभ होईल, लोकप्रियतेत वृद्धि होईल. रोग, ऋण संबंधी कार्यात विशेष लाभ.

**सिंह**
कामात यश सुनिश्चित. कामाची गति बाधित होऊ शकते. सामाजिक क्षेत्रात, ज्ञानवर्धक कामांमध्ये हजेरी द्यावी लागेल.

**कन्या**
व्यापार राहील. विवाह योग, घरात शुभ मांगलिक कार्ये. व्यापारिक भागीदारीसाठी उत्तम वेळ. अधिकारांचा योग्य वापर करा.

**तूळ**
व्यापारात बुद्धिमत्ता, दूरदर्शितेची प्रशंसा होईल. अत्यधिक प्रयत्नांचा अल्प लाभ मिळेल. तणाव अडचणी राहतील.भागीदारी पक्षात होऊ शकते.

**वृश्चिक**
उत्तम वाहन सुख. तब्बेतीत सुधारणा. धार्मिक कार्यात वेळ जाईल.कोणतेही काम एखाद्यावर विसंबून राहून करू नका. आरोग्य नरम-गरम राहील.

**धनु**
आत्मविश्वास हीच यशाची गुरुकिल्ली असते. चांगल्या घटना घडतील.कौटुंबिक सुख लाभेल. आलेली संधी न गमावणे हे तुमच्या यशाचे रहस्य.

**मकर**
स्पर्धा, पैज जिंकू शकाल. लाभ होईल.मनावरील दडपण दूर. अनुसंधानातून कार्यक्षेत्रात प्राप्ति योग. धर्म, आध्यात्मात रूचि वाढेल.

**कुंभ**
अर्थप्राप्ती झाल्याने खर्चाचे प्रश्न सुटतील. अध्ययनात छान यश. अर्थ प्राप्तिचा योग. परिश्रमाने कामाचे शुभ परिणाम येतील.

**मीन**
मनाला प्रसन्नता वाटेल. वैवाहिक जीवनात सुख मिळेल. मित्रांकडून आर्थिक लाभ होईल. आनंदाची बातमी मिळेल. पाठबळ मिळेल.

नियमित वाचा
दै. ठाणे जीवनदीप वार्ता



नवी मुंबई महानगरपालिका शाळा क्र. ३१, कोपरखैरणे नवी मुंबई स्टाफ



उत्सव नवरंगांचा – अंबरनाथ नगर परिषदेतील महिला अधिकारी आणि कर्मचारी वर्ग

# टोरेंट पॉवरकडून भिवंडीमध्ये 'ऑल-वुमन कस्टमर केअर सेंटर' ची सुरुवात

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी** : नवरात्रीच्या अष्टमीच्या शुभ दिवशी टोरेंट पॉवरने महिला सक्षमीकरणाच्या दिशेने एक विशेष पाऊल उचलत आपल्या पटेल कस्टमर केअर सेंटर (अंजूरफाटा) याचे रूपांतर ऑल-वुमन कस्टमर केअर सेंटरमध्ये केले आहे. या केंद्राचे संपूर्ण संचालन आता महिलांकडून केले जात आहे यात फ्रंट-डेस्क अधिकारी, सहाय्यक कर्मचारी तसेच सुरक्षा रक्षक सर्वच महिला आहेत.अशी माहिती टोरेंट पावर कंपनीचे जनसंपर्क अधिकारी चेतन बदीयानी यांनी दिली.

नवरात्री हा स्त्रीशक्तीचा उत्सव आहे, ज्यामध्ये आदिशक्ती माता दुर्गा आणि कालीमातेची पूजा करून धैर्य, सामर्थ्य आणि शक्तीचे प्रतीक मानले जाते. हाच संदेश पुढे नेत टोरेंट पॉवरने ही अनोखी संकल्पना साकार केली आहे. या उपक्रमातून महिला कर्मचाऱ्यांच्या योगदानाचा गौरव होत असून कार्यक्षेत्र अधिक समावेशक व प्रगतिशील करण्याचा प्रयत्नही सुरू आहे.

"महिला आमच्या संस्थेचा अविभाज्य भाग आहेत आणि विविध विभागांमध्ये त्यांनी उल्लेखनीय योगदान दिले आहे. नवरात्रीच्या अष्टमीच्या पवित्र दिवशी, जो स्त्रीशक्तीचे प्रतीक मानला जातो, आम्हाला हा उपक्रम राबवताना अभिमान वाटतो. पटेल सेंटरचे 'ऑल-वुमन कस्टमर केअर सेंटर' मध्ये रूपांतर हे आमच्या महिला कर्मचाऱ्यांना समर्पित आहे आणि महिला सक्षमीकरणाविषयी आमची बांधिलकी दर्शवते. असल्याचे त्यांनी सांगितले. भिवंडीत टोरेंट पॉवर नेहमीच ग्राहक सेवा उत्कृष्टतेसाठी ओळखले जाते. कंपनीकडे शहरात 5 कस्टमर केअर सेंटर, 24x7 टोल-फ्री हेल्पलाइन, टोरेंट पॉवर मोबाइल अॅप, ई-मेल हेल्पलाइन तसेच व्हॉट्सअॅप सेवा उपलब्ध आहेत, ज्यामुळे ग्राहकांना त्वरित, विश्वासार्ह आणि सोयीस्कर सेवा मिळते. या 'ऑल-वुमन सेंटर'मुळे या सेवांचा दर्जा आणखी उंचावला गेला असून महिला सक्षमीकरणाचा संदेश दिला असल्याचे जनसंपर्क अधिकारी बदीयानी यांनी सांगितले.या उपक्रमाचे ग्राहकांनीही स्वागत केले असून महिला कर्मचाऱ्यांच्या आत्मविश्वास आणि कार्यकुशलतेचे कौतुक केले आहे. टोरेंट पॉवरने केवळ नवरात्रीच्या धार्मिक भावनांना विशेष महत्त्व दिले नाही, तर सामाजिक सक्षमीकरण आणि उत्कृष्ट सेवा एकत्रितपणे कशा साध्य करता येऊ शकतात याचा आदर्शही निर्माण केला असल्याचे त्यांनी सांगितले.

# कर्जत येथे शेतकरी मेळावा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**रायगड** : अखिल भारतीय समन्वित बीज प्रकल्प अंतर्गत आदिवासी उपयोजना आणि अनुसूचित जाती उपयोजनांतर्गत आयोजित शेतकरी मेळावा, कृषी निविष्ठा वितरण कार्यक्रम व स्पीड ब्रीडींग प्रकल्प उद्घाटन समारोह कार्यक्रम डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, प्रादेशिक कृषी संशोधन केंद्र कर्जत येथे सोमवार, दि.6 ऑक्टोबर 2025 रोजी संपन्न होणार असल्याची माहिती सहयोगी संशोधन संचालक, प्रादेशिक कृषी संशोधन केंद्र कर्जत यांनी दिली आहे.

या कार्यक्रमाकरिता कृषी मंत्री तसेच विभागातील खासदार, आमदार, कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे येथील वरिष्ठ अधिकारी, कार्यकारी परिषदेचे सदस्य आणि डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाचे कुलगुरु, सर्व सन्माननीय संचालक, कृषी विभागाचे वरिष्ठ अधिकारी व मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

# पडघा येथील शेतकरी सहकारी भातगिरणी वार्षिक सभा संपन्न



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**पडघा** : भिवंडी तालुक्यातील विविध गावांतील ७४५ शेतकरी सभासद व ३ लाख १८ हजार रुपये भागभांडवल असलेल्या पडघ्यातील शेतकरी सहकारी भातगिरणी मर्यादित या संस्थेची वार्षिक सभा उत्साहात संपन्न झाली.

सभापती दयानंद दुंदाराम पाटील यांच्या अध्यक्षतेखाली संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा पडघा सेवा सोसायटीच्या नवीन बांधकाम इमारतीत सोमवारी विविध विषयासंदर्भात आयोजित करण्यात आली होती यावेळी मागील सभेचे इतिवृत्त, ताळेबंद व नफा तोटा पत्रके, अंदाजपत्रक व अजेंड्यावरील इतर विषयाचे वाचन मंजुरी घेण्यात आली.यावेळी विविध विषयासंदर्भात संस्थेच्या सभेत उपस्थित सदस्यांनी प्रश्न उपस्थित केले. त्यावर साधक बाधक चर्चा करून निर्णय घेण्यात आले. यावेळी सभापती दयानंद पाटील व्यवस्थापक शितल कशीवले यांनी व संचालकांनी समाधानकारक उत्तरे दिली.तर यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सचीन पाटील संस्थेचे संचालक दत्तात्रेय पाटोळे, विष्णु पाटील, प्रकाश भोईर, अजय पाटील, श्रीकांत गायकर, विलास पाटील, विकास पाटील, संतोष जाधव, काशीनाथ शेलार भास्कर पाटील, कुसुम माघे, सुनंदा भोईर, तज्ञ संचालक गोपीनाथ कथोरे, रामचंद्र पाटील,पडघा टीडीसी बँकेचे व्यवस्थापक चंद्रशेखर दोंदे उपस्थीत होते.यावेळी संस्थेचे सभासद रमेश पाटील,गुरूनाथ मते, संतोष फापे गोपीनाथ पाटील,नितीन चंदे, गुरूनाथ गायकर, मोतीराम घरत, भगवान सांबरे, गुरूनाथ मोरे, ज्ञानेश्वर म्हात्रे, मंगल भेरे, मनोहर पाटील यांनी चर्चेत सहभाग घेतला. सभेचे सुत्रसंचालन सचिव शितल कशीवले यांनी केले.तर आभार संचालक विलास पाटील यांनी मानले यावेळी सभासदांसाठी संस्थेच्या वतीने स्नेहभोजनाची व्यवस्था करण्यात आली होती.

# टिटवाळा येथे वैश्य समाजाचा विद्यार्थी गुणगौरव सोहळा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**वाशिंद** : ठाणे पालघर जिल्हा महाराष्ट्रीय वैश्य समाज संघाच्या वतीने विद्यार्थी गुणगौरव सोहळा 2025 चे आयोजन करण्यात आल्याची माहीती जिल्हा अध्यक्ष निलेश गंध्ये यांनी दिली.

ठाणे-पालघर जिल्हा महाराष्ट्रीय वैश्य समाज संघाच्या वतीने सन 24-25 या वर्षातील इयत्ता 10 वी, 12वी, पदविधर, पदव्यत्तर, एम. पी. ए. सी., यु.पी.एस. सी परीक्षा डाक्टर, वकील, इंजिनियर, व ईतर क्षेत्रात विशेष प्राविण्य प्राप्त केलेल्या वैश्य समाजातील विद्यार्थ्यांचा गुणगौरव केला जाणार आहे असी माहीती शैक्षणिक समिती सभापती वैभव गंधे यांनी दिली.या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून गणेश शिक्षण प्रसारक मंडळ टिटवाळ्याचे प्राचार्य व संचालक चंद्रशेखर दलाल (सर ) व श्री. सदगुरु साईस्थान ट्रष्ट चे ट्रष्टी अशोक दलाल असणार आहेत. हा कार्यक्रम टिटवाळा येथे शनिवार दि. 4 आक्टोबर रोजी सायंकाळी ठिक 4 वाजता अशोका मरेज लान्स येथे संपन्न होणार आहे. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शैक्षणिक समितीचे सदश्य विशेष मेहनत घेत आहेत.

# शहराची ओळख ही शहराच्या स्वच्छतेमुळे होत असते!

## - महापालिका अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड




दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : शहराची ओळख ही शहराच्या स्वच्छतेमुळे होत असून यामध्ये सफाई कर्मचारी यांचा मोलाचा वाटा असतो असे प्रतिपादन महापालिकेचे अतिरीक्त आयुक्त हर्षल गायकवाड यांनी काल केले .कल्याण डोंबिवली महानगरपालिका आयुक्त अभिनव गोयल यांच्या मार्गदर्शनाखाली केंद्र शासनाच्या " स्वच्छता ही सेवा-स्वच्छोत्सव २०२५" या अभियानाच्या अनुषंगाने काल महापालिकेच्या प्र.के.आचार्य अत्रे रंगमंदिरात सफाई कर्मचारी तसेच सफाई मित्र यांचेकरीता आयोजिलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमात बोलताना त्यांनी हे प्रतिपादन केले.

या समयी महापालिकेचे मुख्य लेखापरीक्षक सुरेश बनसोडे, मुख्य लेखा अधिकारी दिग्विजय चव्हाण, अतिरिक्त शहर अभियंता जगदीश कोरे, महापालिका सचिव किशोर शेळके ,घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त प्रसाद बोरकर, उपायुक्त संजय जाधव, महापालिकेचा इतर अधिकारी व कर्मचारी वर्ग तसेच सुमारे ७०० ते ७५० सफाई कर्मचारी व सफाई मित्र तसेच एनजीओ, महाविद्यालयातील एनएसएसचे विद्यार्थी उपस्थित होते.


सदर कार्यक्रमामध्ये महापालिकेच्या सफाई कर्मचाऱ्यांसाठी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते त्याचप्रमाणे प्रधानमंत्री जन आरोग्य योजना, प्रधानमंत्री आवास योजना, प्रधानमंत्री उज्वला योजना तसेच पोस्ट ऑफिस मधील बचत योजना यांची माहिती उपस्थित सफाई कर्मचाऱ्यांना देण्यात आली. यावेळी महापालिकेच्या एकूण २७३ कर्मचारी यांची आभा कार्डासाठी व १३५ कर्मचारी यांची प्रधानमंत्री आयुषमान भारत कार्डासाठी नोंदणी करण्यात आली.

त्याचप्रमाणे महापालिकेच्या प्रभागक्षेत्र कार्यालयामध्ये कार्यरतअसलेले एकूण ६० मुकादम व सफाई कर्मचारी तसेच विविध अभियानामध्ये महापालिकेस सहकार्य करणा-या एनजीओ व एनएसएस चे विद्यार्थी यांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रशस्तीपत्रक देवून गौरविण्यात आले.कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित सर्व अधिकारी व कर्मचारी तसेच एनजीओ सदस्य व महाविद्यालयीन विद्यार्थी यांचेमार्फत स्वच्छता शपथ घेण्यात आली,या कार्यक्रमामध्ये महापालिकेचे अधिकारी व कर्मचारी विशेषत: सफाई कर्मचारी यांचेमार्फत गायन व नृत्य कलेचे बहारदार सादरीकरण करण्यात आले . कार्यक्रमाची सांगता मुख्य स्वच्छता अधिकारी आगस्तीन घुटे यांनी उपस्थितांचे आभार मानून केली. सफाई कर्मचाऱ्यांनी बहुसंख्येने उपस्थित राहून या कार्यक्रमास चांगला प्रतिसाद दिला.

# भिवंडीत महानगरपालिकेचा रस्ता खोदून इमारतीकरिता अनधिकृतपणे ड्रेनेज लाईनचे काम

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी** : १) मोने-भिवंडी, धोबी तलाव स्टेडिअमचा मागे, क्रांति सायझिंगचा समोर, रोशन बाग, भिवंडी येथे ७पाहणी केली असता त्याठिकाणी श्री. आसिफ शेख यांनी मनपाची कोणतीही पूर्व परवागनी न घेता अनधिकृतपणे महानगरपालिकेचा रस्ता खोदून इमारतीकरिता ड्रेनेज लाईन टाकण्याचे काम केले असल्याने महानगरपालिकेच्या रस्त्याचे नुकसान रु.१४,०००/- प्रती मिटर प्रमाणे (रु.१४,०००, मिटर) = रु.९८,००० असे एकूण रु. ९८,०००/- (अक्षरी रु. आठ्यानणय हजार रु. मात्र) नुकसान झाल्याने त्यांचा विरुद्ध भोईवाडा पोलिस स्टेशन येथे भारतीय न्याय संहिता सन २०२३ चे कलम ३२४(४) (५), ३२६(ब) (क) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.





२) मोजे-भिवंडी, केसर बाग, ठाणा रोड, भिवंडी येथे पाहणी केली असता त्याठिकाणी प्लंबर श्री. नसीम अख्तर अंसारी (उर्फ चुन्नू) व प्लंबर श्री. मुमताज अंसारी (उर्फ बबीया) यांनी मनपाची कोणतीही पूर्व परवागनी न घेता महानगरपालिकेच्या नालवाहिनीला छिद्र पाडून अर्धा इंच व्यासाची ७ नळ अनाधिकृत जोडणी घेतलेली असल्यामुळे महानगरपालिकेच्या पाण्याची चोरो अर्धा इंच प्रती व्यापारी कनेक्शन रु.१२,०००/- प्रमाणे (रु.१२०००० ७ कने,)= रु.८४,००० असे एकूण रु. ८४,०००/- (अक्षरी रु. छप्पन्न हजार रु. मात्र) नुकसान झाल्याने त्यांचा विरुद्ध भोईवाडा पोलिस स्टेशन येथे भारतीय न्याय संहिता सन २०२३ चे कलम ३२४ (४), ३२६ (अ),३०३ (२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

३) मोजे-भिवंडी, चार चाळी, दर्गा रोड, भिवंडी येथे पाहणी केली असता त्याठिकाणी श्री. समीर मोहम्मद यूसुफ मोमीन (समीर प्लंबर) यांनी मनपाची कोणतीही पूर्व परवागनी न घेता महानगरपालिकेच्या जालवाहिनीला छिद्र पाडून तळ अधिक सहा मजली इमारतीकरिता अर्धा इंच व्यासाची ५ नळ अनाधिकृत जोडणी घेतलेली असल्यामुळे महानगरपालिकेच्या पाण्याची चोरी अधां इंच प्रती व्यापारी कनेक्शन रु.१२,०००/- प्रमाणे (रु.१२०००० ५. कने.) रु.६०,००० असे एकूण रु. ६०,०००/- (अक्षरी रु. साठ हजार रु. मात्र) नुकसान झाल्याने त्यांचा विरुद्ध भोईवाडा पोलिस स्टेशन येथे भारतीय न्याय संहिता सन २०२३ चे कलम ३२४(४), ३२६ (अ), ३०३ (२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई मा. प्रशासक तथा आयुक्त सो, यांचे आदेशान्वये मा. कार्यकारी अभियंता श्री. संदीप पटणावर, पाणी पुरवठा विभाग यांचे मार्गदर्शनाखाली उप अभियंता श्री. सरफराज अंसारी यांचे अधिपत्याखाली श्री. विराज भोईर, पथक प्रमुख, श्री. नफीस मोमीन, सहाय्यक पथक प्रमुख यांचे मार्फत करण्यात आली.

# हॉटेलमध्ये वड्यात सापडली पाल

## नागरिकांचा संताप अनावर

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण** : गेल्या काही दिवसांपासून जेवणात अळया, झुरळ असे कीटक सातत्याने आढळत असल्याच्या घटना समोर आल्या आहेत. दरम्यान, आता चौक बाजारपेठेत येथील एका नामांकित हॉटेलमध्ये पाल आढळल्याची माहिती समोर येत आहे. या घटनेमुळे ग्राहकांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. वडापाव खाताना ग्राहकाला वड्यामध्ये पाल आढळल्याने सोमवारी चौक गावात मोठी खळबळ माजली. या घटनेनंतर संतप्त ग्रामस्थांनी हॉटेल बंद पाडले.

मिळालेल्या माहितीनुसार, चौक बाजारपेठेत उजाला हॉटेलमध्ये सोमवारी (दि. 29) नाश्ता करण्यासाठी भरत वाघ हे गेले होते. या वेळी वडापाव खाताना त्यांना तोंडात काहीतरी वेगळे जाणवल्याने भरत यांनी वडा कुस्करून पाहिला असता पूर्ण वाढ झालेली पाल मृतावस्थेत आढळून आली. या घटनेनंतर येथील ग्राहकांनी हॉटेल मालकाला जाब विचारला असता त्याने उडवाउडवीचे उत्तर दिले. त्यामुळे ग्राहकांनी संताप व्यक्त केला. दरम्यान, ही घटना चौक गावात वाऱ्यासारखी पसरल्यानंतर जागरूक ग्रामस्थांनी हॉटेलमालकाला हॉटेल बंद करण्यास सांगितले.या अगोदरही हॉटेलमध्ये झुरळ आढळली होती. या बाबत अन्न व औषध प्रशासन यांच्याकडे तक्रार केली आहे




# वासिंदमध्ये मुसळधार पावसाने भात शेतीचे नुकसान

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर ग्रामीण** : गेल्या अनेक दिवसापासून शहापूर तालुक्यातील वासिंद व वासिंद परिसरात धुवाधार कोसळणाऱ्या पावसाने धुमाकूळ घातला असून या परिसरातील शेतकऱ्यांच्या भात शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे त्यामुळे शेतकरी पुरता हवालदिल झाला असून त्याचे कंबरडे मोडले आहे मोठ्या प्रमाणात भात शेतीचे प्रचंड नुकसान झाल्याने शासनाने याची दखल घेत लागलीच पंचनामे करून शासन स्तरावरून शेतकऱ्यांना आर्थिक मदत करावी व शेतकऱ्यांना धीर द्यावा अशी मागणी शेतकऱ्यांकडून केली जात आहे.



काळ शनिवारी रात्री पासून ठाणे-पालघर जिल्ह्यातील अनेक भागात जोरदार पाऊस सुरू आहे. या पावसाने जोर धरल्याने शेतात पाणी साचलं तर काही ठिकाणी भातशेती आडवी पडली आहेत यामुळे लागवड केलेल्या भातपिकांचं मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे

### शहापूर तालुक्यात 3000 हेक्टर शेतीवर भात नाचणी वरई भाजीपाला आदी पिकांच्या लागवडीचे नुकसान

शहापूर तालुक्यात 3000 हेक्टर शेतीवर भात नाचणी वरई भाजीपाला आदी पिकांची लागवड केलेली आहे परंतु गेल्या कित्येक दिवसापासून धुवाधार कोसळणाऱ्या पावसामुळे ही पिके धोकादायक बनली असून मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे त्यामुळे शेतकरी पुरता हवालदील झाला असून त्याचे कंबरडे मोडले आहे सध्या स्थितीत या पिकांमध्ये दाना तयार होण्याची प्रक्रिया सुरू होती त्यात पावसाने दाना भिजल्यामुळे दाना परिपक्व होणार नाही आणि शेतकऱ्यांची अनेक हलवार पिके ही तयार झाली होती परंतु पावसामुळे ती पूर्णपणे कोलमडून पडल्याने शेतातील पाण्यामध्ये पूर्णपणे भिजून गेली त्यामुळे शेतकऱ्याच्या हाती काही लागणार नाही अशी परिस्थिती निर्माण झाली आहे सध्या सततच्या कोसळणाऱ्या पावसामुळे भातसा धरणाचे पाच दरवाजे उघडले असून त्यातून 65 हजार 814 तर तानसा धरणातून 41990 आणि मोडक सागर धरणातून 62,267क्युसेस व वैतरणा धरणातून 22425 क्युसेस पाण्याचा विसर्ग सुरू आहे त्यामुळे नदीकाठच्या सर्व गावांना सतर्क राहण्याचे आदेश शासकीय कार्यालयातून दिले असून नागरिकांनी याची खबरदारी घ्यावी असे आवाहन केले आहे.

सदर, या पावसामुळे शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात नुकसानीला सामोरे जावे लागणार असल्याने याबाबत सरकारने तात्काळ ओळा दुष्काळ जाहीर करावा अशी मागणी विविध शेतकरी संघटना व शेतकऱ्यांमधून केली जात आहे. काही दिवसांपासून पाऊस सातत्याने सुरू आहे. यामुळे जनजीवन पूर्णपणे विस्कळित झाले. अनेक पुलावरुन पाणी वाहत असल्याने वाहतूक पूर्णपणे ठप्प झालेली होती त्यामुळे रोजच ये-जा करणाऱ्या प्रवाशी, दुग्धविक्रेते भाजीपाला विक्रेते तसेच वाहतूक करणारे वाहन चालक यांचा प्रचंड खोळंबा झाला. त्यातच किरकोळ विक्रेते व व्यापारी वर्ग यांनाही या सततच्या कोसळणाऱ्या पावसाचा फटका बसला आहे.

## भाजपा कार्यकर्त्या पुष्पा रत्नपारखी यांच्यातर्फे कष्टकरी महिलांची ओटी भरून सन्मान

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** नवरात्रीचे औचित्य साधून भाजपा कार्यकर्त्या पुष्पा रत्नपारखी यांनी योगीधाम परिसरात राहणाऱ्या भाजी विक्रेत्या, फळ विक्रेत्या व घर काम करणाऱ्या 108 कष्टकरी महिलांची ओटी भरून, यातून त्यांचे समाजात खास स्थान आहे हे त्यांना सांगण्याचा प्रयत्न केला.

रस्त्यावर फळे व भाजीपाला विकत असताना, तसेच कुठे घरकाम करत असताना, त्यांना बऱ्याच अडीअडचणी येत असतील. परंतु न डगमगताना कधी संयमी, शांत राहून किंवा कधी रुद्र अवतार दाखवून त्या जणू देवीच्या नऊ रूपांप्रमाणेच शैलपुत्री, ब्रह्मचारिणी, चंद्रघंटा, कुशमांडा, स्कंदमाता, कात्यायांनी, कालरात्री, महागौरी, सिद्धीरात्री रोज अवतरत असतात. त्यांना त्या आमच्यासाठी खूप स्पेशल आहेत आम्ही असे सांगितल्यावर त्यांना खूप आनंद झाला.

त्यांच्या चेहऱ्यावरील आनंद बघून आम्हाला खूप समाधान वाटल्याचे पुष्पा रत्नपारखी यांनी सांगितले. यावेळी भाजपा महिला मंडळ अध्यक्ष भावना मनराजा, उषा दिसले, भक्ती साळवी, नयना नायर, सुनिता भागवत, संगीता घोलप, सीमा सिंग, शिल्पा रायकवार, जास्मिना लीलानी आदी भाजपा महिला पदाधिकारी उपस्थित होत्या.

## अल्कोहोलिक्स ॲनॉनिमस(ए.ए.) कल्याणआंतरसमूह तर्फे जनहितार्थ उपक्रम

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : अल्कोहोलिक्स ॲनॉनिमस कल्याण आंतर समूह तर्फे एक ऑक्टोबर रोजी मद्य पीडित लोकांपर्यंत ए ए चा संदेश देण्यासाठी जनजागरण स्टॉल सकाळी 09 ते 01 या वेळेत ठेवण्यात येणार आहे. तसेच हा जनहितार्थ उपक्रम महाराष्ट्रातील इतर जिल्हा, तालुका, गाव या ठिकाणी जास्तीत जास्त शासकीय/खासगी हॉस्पिटलमध्ये राबविला जाणार आहे. स्टॉल वर उपस्थित ए ए सभासद 'मद्यपाश आजार' आणि त्यातून बाहेर पडण्यासाठी उपलब्ध असलेला ए.ए. चा सुधारणा कार्यक्रम याबद्दल माहिती देण्यात येणार आहे तसेच याची मोफत माहितीपत्रके वाटप करणार आहेत.अधिक माहितीसाठी ए. ए. कल्याण आंतर समूह क.डों.महानगरपालिकेचे महात्मा फुले नागरी आरोग्य केंद्र, रिजन्सी अवेन्यू, सिंडिकेट, मुरबाड रोड,कल्याण (प.) येथे किंवा मोबाईल क्र. 9323485476 वर संपर्क करावा असे जाहीर आवाहन करण्यात आले आहे.

# भिवंडी महापालिकेच्या विकास आराखडा गैरव्यवहाराबाबतीत शासनाने चौकशी करून कारवाई करा – आमदार महेश चौघुलेंची मागणी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी** : भिवंडी- शहर महानगरपालिका हद्दीतील विकास आराखड्याबाबत (डीपी ) झालेली प्रक्रिया ही संपूर्णपणे भ्रष्टाचार, गैरव्यवहार व अपारदर्शकतेचे मूळ ठरत असल्याचा गंभीर आरोप शहरातील नागरिक आणि विविध संस्थांकडून करण्यात येत आहेत, त्यामुळे या सर्व आरोपांची सखोल चौकशी करून संबंधित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी भिवंडी चे आमदार महेश चौघुले यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे लेखी पत्राद्वारे केली आहे.

भिवंडीच्या विकास आराखड्यात कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार,नियमबाह्य आरक्षणे,चुकीची जमीन समाविष्ट करणे,नागरिकांच्या सूचनांना नाकारून ठरावीक गटांना लाभ मिळवून देणे अशा गंभीर तक्रारी पुढे येत आहेत.यामुळे केवळ विकास आराखडा दूषित झाला नाही तर संपूर्ण शहराच्या विकास प्रक्रियेलाच तडा गेला आहे. या बाबत आमदार महेश चौघुले यांच्यासह इतर जनप्रतिनिधींनी या संदर्भात वारंवार लेखी पत्रव्यवहार करून शासनाचे लक्ष वेधले आहे तरी देखील आजतागायत कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही, ही शहराच्या भविष्याच्या दृष्टीने अत्यंत धक्कादायक बाब आहे.विकास आराखडा हा पुढील पिढीच्या दृष्टीने व शहराच्या भवितव्याशी थेट संबंधित असताना प्रशासनाने नागरिकांच्या आक्षेप- सूचनांकडे पूर्णतः दुर्लक्ष केले आहे. त्यातून भूमाफियांचे व काही स्वार्थी गटांचे हित साधले जात असल्याचा स्पष्ट संशय निर्माण झाल्याची शंका आ.चौघुले यांनी व्यक्त केली आहे. या बाबत दि.१४ फेब्रुवारी २०२५ रोजीच्या पत्राच्या अनुषंगाने मुख्यमंत्री महोदयांनी प्रधान सचिव नगरविकास विभाग-२ यांना चौकशी चे निर्देश दिले होते.परंतु त्याचे पुढे काय झाले ?,याबाबत लोकप्रतिनिधी म्हणून मला शासन व प्रशासनाने पत्राच्या अनुषंगाने कोणताही प्रकारचे



उत्तर द्यावे,असे वाटले नाही,अशी खंत आ.चौघुले यांनी आपल्या पत्रात व्यक्त केली. दरम्यान भिवंडीच्या पुढील वीस वर्षाकरिता बनविण्यात आलेल्या भिवंडी विकास आराखड्यातील सर्व गैरव्यवहार व भ्रष्टाचार प्रकरणांची उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी.

चौकशीसाठी निवृत्त न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली स्वतंत्र समिती नेमून सर्व प्रक्रिया तपासण्यात यावी.चौकशी पूर्ण होईपर्यंत सद्य स्थितीतील विकास आराखडा तात्काळ स्थगित करण्यात यावा. दोषीअधिकारी,सल्लागार व संबंधितांवर फौजदारी गुन्हे दाखल करून कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणी आ.चौघुले यांनी केली आहे.

भिवंडीकरांच्या भावी पिढ्याचे भविष्य या आराखड्यावर अवलंबून असताना, भ्रष्टाचाराने ग्रासलेल्या या आराखड्याला मंजुरी देणे म्हणजे नागरिकांच्या विश्वासाला तडा देणे होय.त्यामूळे मुख्यमंत्री स्तरावरून तात्काळ चौकशीचे आदेश देऊन दोषीवर कारवाई होणे गरजेचे आहे.अन्यथा नागरिकांच्या असंतोषाला वाचा फुटून मोठे आंदोलन उभे राहण्याची शक्यता नाकारता येणार नाही. या बाबत भिवंडीवासीयांच्या हिताचा निर्णय अपेक्षित असून, याबाबत आपण तातडीने निर्णय घेण्यात यावा. तसेच शहराच्या भविष्याच्या हेतूने दिलेल्या पत्राच्या अनुषंगाने केलेल्या चौकशीच्या निर्देशानुसार आतापर्यंत काय कार्यवाही करण्यात आली, याची माहिती तत्काळ उपलब्ध करून देण्यात यावी, अशी मागणी आमदार महेश चौघुले यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली आहे.

## सावरगावच्या दसरा मेळाव्याला लाखोंच्या संख्येने उपस्थित रहा - धनराज गुट्टे



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : पर्यावरण मंत्री पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांच्या नेतृत्वाखाली होत असलेल्या सावरगाव येथील दसरा मेळाव्याला दरवर्षी प्रमाणे याही वर्षी मुंबई सह राज्यभरातून लाखोंच्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन दिनांक 30 सप्टेंबर 2025 रोजी शासकीय विश्रामगृहात, ठाणे येथे आयोजित वंजारी समाजाचे दसरा मेळावाबाबत महत्वपूर्ण बैठकीत बोलताना ओबीसी नेते तथा वंजारी समाजाचे युवक नेतृत्व धनराज भाऊ गुट्टे यांनी केले.

या बैठकीला डॉ.अमोल गीते, डॉ अनंत वायभासे, डॉ हरीश केदार, गजानन आंधळे, संदीप चकोर, निखिल घुगे, प्रवीण खाडे, शिवाजी वाघ, अर्जुन चेमटे, अशोक बडे, स्वप्नील मुंढे, राहुल पालवे, सहदेव जायभये, शिवाजी जयभाये, भागवत गर्जे सह ठाणे, मुंबई, पनवेल, नवी मुंबई, कल्याण, मीरा भाईंदर, बदलापूर, टिटवाळा, अंधेरी, गोरेगाव, भिवंडी, घोडबंदर,भायखळा, नाशिक, पुणे, पालघर, वसई, विरार येथील समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना व पंडित दिनदयाल उपाध्याय स्वयंम योजनेच्या अर्जास मुदतवाढ

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण** : सन 2025-26 या वर्षापासून ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना व पंडित दिनदयाल उपाध्याय स्वयंम योजना https://hmas.mahait.org, या पोर्टलवर ऑनलाईन करण्यात आल्या आहेत. त्यानुसार ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना व पंडित दिनदयाल उपाध्याय स्वयंम योजनेकरीता पात्र विद्यार्थ्यांनी https://hmas.mahait.org, या पोर्टलवर ऑनलाईन अर्ज भरुन आवश्यक त्या सर्व कागदपत्रांसह परिपूर्ण प्रस्ताव सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, रायगड, कच्छिभवन, नमिनाथ जैन मंदिरा जवळ, श्रीबाग रोड, अलिबाग येथे सादर करावेत असे आवाहन सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, रायगड सुनिल जाधव यांनी केले आहे.

राज्यातील इतर मागासवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार व पंडित दिनदयाल उपाध्याय स्वयंम योजनेंतर्गत प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रकाची मुदत दि.19 सप्टेंबर ते 29 सप्टेंबर 2025 देण्यात आली होती. वसतिगृहामध्ये प्रवेशासाठी अर्ज करावयाच्या कालावधीमध्ये वाढ करण्याची विद्यार्थ्यांची मागणी झाल्याने या प्रवेश प्रक्रियेसाठी खालील विवरणपत्राप्रमाणे मुदतवाढ देण्यात आली आहे.

**अर्ज सादर करण्याकरीताचे वेळापत्रक पुढीलप्रमाणे :-** 12 वी नंतरच्या दिनांक व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम (बिगर व्यावसायिक अभ्यासक्रम वगळून), प्रवेशासाठी अर्ज करावयाचा कालावधी दि.30 सप्टेंबर ते 26 ऑक्टोबर 2025, अर्ज छाननी करावयाचा कालावधी- दि.27 ऑक्टोबर ते दि.04 नोव्हेंबर 2025, पहिली निवड यादी गुणवत्तेनुसार प्रवेशाची अंतिम मुदत- दि.20 नोव्हेंबर 2025.

## जागर दुर्गाशक्तीचा" या नवरात्रउत्सवानिमित्त जीवनदीप कनिष्ठ महाविद्यालयात हळदीकुंकू सोहळा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता




जागर दुर्गाशक्तीचा" या उपक्रमाच्या निमित्ताने जीवनदीप कला, विज्ञान व वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालयात महिलांसाठी हळदीकुंकू सोहळ्याचे आयोजन पारंपरिक आणि सांस्कृतिक वातावरणात मोठ्या उत्साहात करण्यात आले. संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. रवींद्रजी घोडविंदे सर यांच्या प्रेरणेतून आणि महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. कैलास कळकटे सर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या कार्यक्रमातून महिलांच्या सशक्तीकरणाचा संदेश देत सामाजिक ऐक्य, परंपरा आणि नवचैतन्याचा सुंदर संगम साकारण्यात आला. कार्यक्रमादरम्यान उपस्थित महिलांनी पारंपरिक वेशभूषेत एकमेकींना हळद-कुंकू लावून स्नेह, आपुलकी आणि एकोप्याचा सण साजरा केला. परंपरेच्या जोडीने आधुनिकतेचा संगम घडवत संवाद सत्रांद्वारे महिलांमध्ये सामाजिक जागरूकतेचा आणि आत्मविश्वासाचा संदेश दिला गेला.सोहळ्याची रंगत वाढवण्यासाठी पारंपरिक रास गरबा सादर करण्यात आला, ज्यामुळे संपूर्ण परिसर आनंद, उत्साह आणि नवचैतन्याने भरून गेला. महिलांच्या सक्रिय सहभागामुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली.

सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.दीप्ती बांगर मॅडम यांनी केले. तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य मा.श्री कैलास कळकटे सर यांनी महिला वर्गातून जेष्ठ महिलांचे स्वागत केले.व महिलांना मार्गदर्शन केले.त्यात महिलांना आपल्या मुलींमध्ये दुर्गाशक्ती जागृत करण्याचा संदेश दिला. या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन प्रा. साक्षी मोकाशी मॅडम, प्रा. सोनाली भवर मॅडम, प्रा .वृचिता चौधरी मॅडम तसेच सर्व शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी वर्गाच्या सक्रिय सहकार्याने करण्यात आले. कार्यक्रमाच्या शेवटी प्रा. माधुरी पाटील मॅडम यांनी मन:पूर्वक आभार मानून सोहळ्याची सांगता केली.

## त्रिविक्रम मंदिरात साकारली तांदळाच्या उकडीच्या मुखवट्याची श्री महालक्ष्मी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : कल्याणच्या पुरातन श्री त्रिविक्रम मंदिर येथे श्री ब्राह्मण भगिनी श्री महालक्ष्मी मंडळ कल्याण यांच्यातर्फे १९३७ सालापासून अष्टमीला श्री महालक्ष्मी पूजन केले जाते. अष्टमीला तांदुळाच्या उकडीचे मुखवट्याची श्री महालक्ष्मी उभी करण्याची प्रथा आहे. यावेळी दर्शनासाठी भाविकांची गर्दी होत असते. तर नवमीला घागरी ही फुंकल्या जातात.



## शॉक लागून कामगाराचा मृत्यू

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : पथदिवे दुरुस्त करताना हाय टेन्शन वायरचा झटका लागल्याने खाजगी कामगाराचा जागीच मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. कल्याण पश्चिमेकडील बिर्ला कॉलेज परिसरात आज दुपारच्या सुमारास विजेच्या धक्क्याने एका कामगाराचा जागीच मृत्यू झाला आहे.

संदीप चौधरी असे मृत्यू झालेल्या कर्मचाऱ्याचे नाव असून तो कल्याण डोंबिवली महापालिकेच्या खाजगी ठेकेदाराचा कामगार होता. पथदिव्यांची दुरुस्ती करत असताना संदीप चौधरी याचा महावितरणच्या हाय टेन्शन वायरला स्पर्श झाला आणि त्याला जोरदार विजेचा झटका बसला. पथदिवे आणि विविध विद्युत उपकरणांच्या दुरुस्तीचे काम करणाऱ्या खाजगी कर्मचाऱ्याच्या मृत्यूमुळे कंत्राटी कामगारांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

## बँक ऑफ इंडिया रायगड विभागातर्फे सतर्कता जागृत अभियानांतर्गत ग्रामसभा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**रायगड** : "सतर्कता हमारी साझा ज़िम्मेदारी Vigilance: Our Shared Responsibility" या थीमसह देशभरात 18 ऑगस्ट ते 17 नोव्हेंबर पर्यंत दक्षता जागरूकता सप्ताह पाळत आहे. या अंतर्गत रायगड विभागातील येणाऱ्या सर्व शाखांनी जिल्ह्यात वेगवेगळ्या ठिकाणी (24 सप्टेंबर 2025) रोजी ग्रामसभा संपन्न झाल्या.

झोनल मॅनेजर दीपन्विता साहनी व डेप्युटी झोनल मॅनेजर भरत सहाय यांच्या मार्गदर्शनानुसार बँक ऑफ इंडिया रायगड झोनतर्फे विविध ग्रामीण व निमशहरी शाखांमध्ये विविध शाखांच्या शाखा व्यवस्थापकांनी ग्रामसभा आयोजित केल्या होत्या. ज्यामध्ये ग्राहकांना फसवणुकीशी संबंधित माहिती देऊन जागरूक करण्यात आले. या बैठकीत ग्राहकांना ओटीपी शेअर करू नका, एटीएम पिन आणि सायबरलिंक शेअर करू नका त्याच बरोबर जास्त व्याज असणारे कर्ज घेऊन कर्जच्या विळख्यात अडकू नका असे सांगण्यात आले. ग्राहकांना कसे कसे फसवले जाते याबाबत संबंधित माहिती देण्यात आली.

## जिल्हा परिषद शिक्षकातून 'केंद्र प्रमुख' पदांवर नियुक्तीसाठी डिसेंबरमध्ये ऑनलाईन परीक्षा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता/**मुंबई :** राज्यातील सर्व जिल्हा परिषद मधील कार्यरत प्राथमिक शिक्षकांना केंद्रप्रमुख पदावर विभागीय मर्यादित स्पर्धा परीक्षेद्वारे नियुक्ती देण्यासाठी 'समूह साधन केंद्र समन्वयक (केंद्र प्रमुख) मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा २०२५ चे ऑनलाईन पद्धतीने आयोजन करण्यात येणार आहे. १ ते ५ डिसेंबर २०२५ या कालावधीत ही परीक्षा होणार असून या माध्यमातून २४१० पदांवर नियुक्ती दिली जाणार आहे. या परीक्षेची अधिसूचना, वेळापत्रक आणि ऑनलाईन आवेदनपत्राची माहिती महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या www.mscepune.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे. सर्व कार्यरत प्रशिक्षित पदवीधर शिक्षक (प्राथमिक) व प्रशिक्षित शिक्षक (प्राथमिक) यांच्या केंद्र प्रमुख पदावर नियुक्तीसाठी ही परीक्षा आयोजित करण्यात आली असून अधिक माहितीसाठी परीक्षार्थी उमेदवारांनी www.mscepune.in या संकेतस्थळास भेट द्यावी, असे आवाहन महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या आयुक्त अनुराधा ओक यांनी केले आहे.

## गुणवंतांचा गुणगौरव व ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार समारंभ

दै.ठाणे जीवनदीप वार्ता



**शहापूर ग्रामीण(नरेंद्र पाटील) :** शहापूर तालुका नॉलेज अकॅडमी, जनकल्याण ना. सह.पतसंस्था व आदिवासी उन्नती मंडळ, मुंबई यांच्या वतीने शहापूर तालुक्यातील शिष्यवृत्ती परीक्षा गुणवत्ताधारक विद्यार्थी व इतर गुणवंतांचा कौतुक सोहळा पार पडला.

यामध्ये तालुक्यातील 5वी ते 8वी मधील 357 विद्यार्थ्यांनी शालेय स्पर्धा परिक्षेतील शिष्यवृत्ती परीक्षेत यश संपादन केलेल्या व भूगर्भ जल तज्ञ हेमंत परदेशी यासह इतर सीए, आयआयटी, नीट, एमबीबीएस आदी गुणवंतांचा सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमावेळी आमदार दौलत दरोडा, शहापूर तालुका नॉलेज अकॅडमी अध्यक्ष रमेश वनारसे, जनकल्याण ना. सह.पतपेढी अध्यक्ष दत्तात्रय पाटील, उपाध्यक्ष दामोदर भेरे, गटशिक्षणाधिकारी रामचंद्र विशे, भिमराव प्रधान महाविद्यालय संस्थापक डॉ. बी. बी. प्रधान, आदिवासी उन्नती मंडळ समन्वयक रामचंद्र कशिवले, प्रतिनिधी दक्षा शेठ, शिक्षण विस्तार अधिकारी हिराजी वेखंडे, संगिता माळी, आशिष झुंजारराव, मुख्याध्यापक संघ तालुकाध्यक्ष दत्तात्रय किरपण, जनकल्याण शि.प्र.मंडळ उपाध्यक्ष एकनाथ वेखंडे, पत्रकार सुनील घरत, केंद्रप्रमुख महेंद्र धिमते आदि मान्यवर उपस्थित होते.

यासाठी अकॅडमीचे पदाधिकारी रमाकांत पाटील, सुधाकर पाटील, रविंद्र भोईर, पतसंस्थेचे नरेंद्र औसरकर, आ.उन्नती मंडळाचे सुधाकर पाटील आदी पदाधिकारी व सदस्य यांनी परिश्रम घेतले होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आदिवासी उन्नती मंडळ प्रतिनिधी सुधाकर पाटील, सुत्रसंचालन रविंद्र भोईर, अरुण पाटील यांनी केले.

## भारतीय मजदूर संघाचा "युवा कार्यकर्ता अभ्यास वर्ग" संपन्न

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : भारतीय मजदूर संघ महाराष्ट्र प्रदेश आणि श्रमशोध मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने भारतीय मजदूर संघाचा 45 वर्षाच्या आतील कार्यकर्त्यांचा दोन दिवसीय "युवा कार्यकर्ता अभ्यासवर्ग" रोजी ठाणे येथील श्रीराम व्यायामशाळेत संपन्न झाला. अभ्यास वर्गाचे उद्घाटन टीजेएसबी अध्यक्ष शरद गांगल यांच्या हस्ते संपन्न झाले. भारतीय कामगारांची कामावरील श्रद्धा, निष्ठा, चिकाटी यामुळे जगभर भारतीय कामगारांना विशेष मागणी आहे असे त्यांनी नमूद केले. शेतकरी, शास्त्रज्ञ, उद्योजक यांच्यासोबतच कामगारांचा देखील राष्ट्र निर्मितीमध्ये मोठा वाटा आहे असे ते म्हणाले.



भारतीय मजदूर संघ देशातील नंबर एकची कामगार संघटना असून तिच्या स्थापनेला आता सत्तर वर्ष पूर्ण झाली आहेत. गेल्या तीन दशकापासून भारतीय मजदूर संघ देशातील नंबर एकची कामगार संघटना आहे. युवा नेतृत्वाचे विकसन व्हावे हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून संपूर्ण देशभर युवा कार्यकर्त्यांचे विशेष अभ्यास वर्ग होत आहेत. याला अनुसरून महाराष्ट्र प्रदेशात आतापर्यंत तीन अभ्यास वर्ग झाले आहेत. ठाण्यात चौथा अभ्यास वर्ग संपन्न झाला. या अभ्यास वर्गात ठाणे, मुंबई, पालघर आणि रायगड या चार जिल्ह्यातून 150 युवा सहभागी झाले होते. संघटन कौशल्य, भारतीय मजदूर संघाची रीतीनिती, कामगार कायदे, कार्यालय, कोश व्यवस्थापन, सोशल मीडियाचा योग्य तो वापर अशा विविध विषयांवर उपस्थित कार्यकर्त्यांना भारतीय मजदूर संघाच्या ज्येष्ठ पदाधिकाऱ्यांनी मार्गदर्शन केले.

यावेळी भारतीय मजदूर संघ महाराष्ट्र प्रदेशाचे अध्यक्ष एडवोकेट अनिल ढुमणे, प्रदेश महामंत्री किरण मिलगीर, भारतीय मजदूर संघ कार्यकारणी केंद्रीय कार्यकारणी सदस्य मोहन ऐणुरे, चंद्रकांत धुमाळ, महाराष्ट्र प्रदेश कोषाध्यक्ष एडवोकेट बाळासाहेब कांबळे तसेच चारही जिल्ह्यांचे पदाधिकारी उपस्थित होते. ठाणे जिल्हा सहकारी बँक कर्मचारी महासंघाच्या सहयोगाने या अभ्यासावर्गाचे आयोजन करण्यात आले होते.

जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोई संचलित
जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित
प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!
१ बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं.३०४२०२) कालावधी १ वर्ष
२ पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं.२०१२३०) कालावधी १ वर्ष
३ जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं.२०१२३७) कालावधी १ वर्ष
४ डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं.२०१४०४) कालावधी २ वर्ष
५ सिक्युरिटी ॲण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं.४११२४) कालावधी ६ महिने
पात्रता : १० वी / १२ वी / पदवी
संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे
Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558

news.thanejeevandeep@gmail.com
दैनिक ठाणे जीवनदीप
WhatsApp Channels
महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक
दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
मुंबई नवी मुंबई ठाणे पालघर रायगड
9619188558 / 9082664781
www.jeevandeepvarta.com/
आपलं हक्काचं दैनिक, दररोज वाचा.

Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com * RNI NO : MAHMAR/2016/72091 * Postal Reg. No. THC/256/2022-2024